470

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १३/१२/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.एसपीपी-०८२४/प्र.क्र.११९/पोल-१० दि.१० डिसेंबर-२०२४

**विषय :-** अॅड अजय मिसर, विशेष सरकारी अभियोक्ता यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत. वर्तकनगर पो.ठा.येको दाखल गु.र.क्र.०१२०/२०२० या प्रकरणातील न्यायालयीन कामकाजासाठी

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.एसपीपी-०८२४/प्र.क्र.११९/पोल-१०, दिनांक १० डिसेंबर- २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१२१०१७४८०९९८२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

( प्रविण शिखरे )

पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

पोलीस आयुक्त, ठाणे शहर,

अपर पोलीस महासंचालक (का.व सु.)महाराष्ट्र राज्य ,मुंबई

विशेष पोलीस महानिरीक्षक, (का.व सु.)महाराष्ट्र राज्य ,मुंबई

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु,) महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे उप सहायक,(गुन्हे).

कार्यासन अधिकारी का.क्र.१४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

ॲड.अजय मिसर, विशेष सरकारी अभियोक्ता यांना
व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत.
वर्तकनगर पो. ठा. येथे दाखल गु.र.क्र.०१२०/२०२० या
प्रकरणातील न्यायालयीन कामकाजासाठी.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक :-एसपीपी-०८२४/प्र.क्र.११९/पोल-१०
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १० डिसेंबर, २०२४.

संदर्भ: १.पोलीस आयुक्त,ठाणे शहर यांचे पत्र क्र.ठा.आ./पो.आ./स्वि.स./१२४८/२०२४, दि.०३.०८.२०२४.
२.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.पोमसं/१४/८८/वर्तकनगर पो.स्टे./वि.स.अ./ २६१/२०२४, दि.०५.०८.२०२४.
३.शासन अधिसूचना, विधि व न्याय विभाग, क्रमांक : एसपीपी-२०२४/यू.ओ.आर.७९/डी-१४, दि.०५.०८.२०२४.

**शासन निर्णय :-**

वर्तकनगर पो. ठा.येथे दाखल गु.र.क्र.०१२०/२०२० या प्रकरणामध्ये मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दुसरे न्यायालय, ठाणे व मा.जिल्हा व सत्र न्यायालय,ठाणे या न्यायालयात शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्याकरीता ॲड.अजय मिसर यांची संदर्भाधीन क्र.३ येथील अधिसूचनेन्वये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यास्तव सदर प्रकरणातील न्यायालयीन कामकाजासाठी ॲड.अजय मिसर यांना खालीलप्रमाणे फी अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**अ) प्रतिदिन परिणामकारक सुनावणी फी -रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख फक्त)**
**ब) विचारविनिमय फी (प्रति विचारविनिमय) -रु.२५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त)**
(प्रतिदिन कमाल मर्यादा रु.१,००,०००/-)

तसेच सदर व्यावसायिक फी व्यतिरिक्त अन्य कोणतेही लाभ ॲड.श्री. अजय मिसर यांना अनुज्ञेय होणार नाहीत. तसेच त्यांना कोणत्याही अपरिणामकारक सुनावणीकरीता व्यावसायिक फीचे प्रदान करण्यात येणार नाही.

२. परिणामकारक सुनावणीचे दिवस संबंधीत प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा अधिकाऱ्याकडून तसेच संबंधित मा. न्यायालयाच्या प्रबंधकाकडून तपासून, प्रमाणित करुन घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता संबंधित पोलीस उपायुक्त/ पोलीस अधीक्षक यांनी घ्यावी.

३. यासाठी येणारा खर्च या विभागाच्या **"मागणी क्रमांक बी-१, २०५५ पोलीस -(००) १०९, जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस दल - (२०५५ ०१६८)- २८ व्यावसायिक सेवा"** या लेखाशीर्षाखालील त्या - त्या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतुदीच्या उपलब्धतेच्या अधीन आणि मंजूर अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात यावा .

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४७७/२०२१/व्यय-७, दिनांक १२/०७/२०२१ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

**५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक संकेतांक क्र. २०२४१२१०१७४८०९९८२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MURLIDHAR MADANRAO MUNDE

Digitally signed by MURLIDHAR MADANRAO MUNDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=6ce40b982ce0fd403128e2717e7e0c7b7377fd69d7d23790cb110e33b1e0491e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=716527D5A822F9E40134FCE6C6C6B8E1521D5C66E1D2D46A3F04B04DE16DF388, cn=MURLIDHAR MADANRAO MUNDE
Date: 2024.12.10 17:49:07 +05'30'

**(मुरलीधर मुंडे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
३) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वर्तकनगर, पोलीस ठाणे, ठाणे शहर.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), मुंबई-१, महाराष्ट्र राज्य.
५) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे.
६) ॲड.श्री.अजय सुहास मिसर (पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचेमार्फत).
७) कार्यासन अधिकारी (का-१४), विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) कार्यासन अधिकारी (व्यय-७), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) निवडनस्ती (पोल-१०)